# नाशिक पंचायत समिती, नाशिक, जिल्हा नाशिक, या संस्थेचा
# सन २००७ - २००८ या वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल

---

जा.क्र.स्था/३/ब/जिप/पंस नाशिक/नाशिक/४७७

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक
लेखा कोष भवन, तिसरा मजला,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
नाशिक
दिनांक-३०.१.२००९

प्रेषक,
उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

नाशिक पंचायत समिती, नाशिक, जिल्हा नाशिक या संस्थेचे सन २००७ - २००८ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण श्री. उ. प्र. जोशी, लेखा परिक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक १०.१०.२००८ ते २०.११.२००८ या कालावधीत पूर्ण केले. या अहवालाचे पुनर्विलोकन व अंतिमीकरण श्री. वि. ए. कोते, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक १९.१२.२००८ रोजी केले.

लेखापरीक्षीत आर्थिक वर्षाच्या कालावधीत खालीलप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी संस्थेचे कामकाज पहात होते.

**सभापती**

| | |
|---|---|
| सौ.मैनाबाई हिरामण खोसकर | १.०४.२००७ ते ३१.३.२००८ |

**गटविकास अधिकारी**

| | |
|---|---|
| श्रीमती. प्रतिभा संपतराव संगमनेरे | १.०४.२००७ ते १०.६.२००८ |
| श्री. नंदकिशोर राजाराम आहेर | ११.६.२००७ ते ३१.३.२००८ |

## भाग पहिला
## (मागील लेखा परीक्षण )

मागील लेखापरीक्षण अहवालांतील खालील परिच्छेद थकीत असुन त्याबाबत मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे स्वतंत्र पत्र व्यवहार सुरु आहे.

| अ. क्र. | वर्ष | परिच्छेद क्रमांक | परि. संख्या |
|---|---|---|---|
| १ | १९७१-७२ | १४ | १ |
| २ | १९७८-७९ | १६(१)<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात सामाविष्ठ परि.क्र.१६(१):- प्रंपभा परीक्षा वसुलीबाबत (६.११७(६) | १ |
| ३ | १९९८-९९ | ४,१८<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात सामाविष्ठ परि.क्र.४:- मुदत बाहय रक्कमा व्यपगत केलेबाबत. (४.११२) | २ |
| ४ | १९९९-२००० | ३,५,१३,१६(ब),१८<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात सामाविष्ठ परि.क्र.३:- निवासस्थान भाडे कमी आकारलेबाबत. (४.३)<br>परि.क्र.१३:- अग्रीम नोंदवहीतील अनियमितता.(४.१०७(१३)<br>परि.क्र.१८:- अपूर्ण बांधकामाबाबत (४.१०७(१३) | ५ |
| ५ | २०००-२००१ | १०,१३,१८<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात सामाविष्ठ परि.क्र.१०:- अग्रीम नोंदवहीबाबत (४.१८५(११)<br>परि.क्र.१३ :- अपूर्ण बांधकामाबाबत (४.१८२(१५) | ३ |
| ६ | २००१-२००२ | ३,४,५,८,९,१०,१४,२१<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात सामाविष्ठ परि.क्र.५-घरकुले अनुदानाबाबत.(४.२९)<br>परि.क्र.८-निवासस्थान भाडे वसुलीबाबत.(४.२५२(१) | ८ |
| ७ | २००२-२००३ | ४,५,१३<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात सामाविष्ठ परि.क्र.१३ - अपूर्ण बांधकामाबाबत (४.२०१(१२)) | ३ |
| ८ | २००३-०४ | ७ | १ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | २००४-<br>२००५ | ४,५,६,१०,१२<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात सामाविष्ठ<br>परि.क्र.१० - ग्रामपंचायतीस देण्यात येणा-या अनुदानाच्या नमुना नं. ७ पोचपावत्या उपलब्ध झालेबाबत.(४.३३७(७))<br>परि.क्र.१२ - अपूर्ण जवाहर विहिरींबाबत. (लघुपाटबंधारे विभाग) (४.३३२(१६) | ५ |
| १० | २००५-<br>२००६ | ४,५,६,८,१०,११,१२,१३,१५,१९,२१,२३<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात सामाविष्ठ<br>परि.क्र. ११ - महिलांसाठी खाजगी शौचालय बांधकामासाठी शौचालय भांडी पुरविणे (४.७१०)<br>परि.क्र. १५ - नाशिक पंचायत समिती अंतर्गत शासनाच्या अनुदानातून बांधलेल्या निवासस्थानांबाबत (४.७७)<br>परि.क्र. २३ - अपूर्ण बांधकामाबाबत (ल.पा.उपविभाग, नाशिक) (४.७२८)(२१) | १२ |

**लेखा परीक्षण अहवाल २००६-२००७**

| | |
|---|---|
| परि.क्र.३ | अंगणवाडीसाठी १००% अनुदानावर पंचायत समिती सेसमधून स्टील पिंप खरेदीतील अनियमिततांबाबत (पंरास प्रस्तावित) |
| परि.क्र.४ | पंचायत समिती सेसमधून नॅपसेक प्लॅस्टीक पंप खरेदीतील अनियमिततांबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परि.क्र.६ | पळसे - आगळेवस्ती - पगारमळा रस्ता तयार करणे. |
| परि.क्र.७ | निवासस्थान अनुज्ञप्ती शुल्क थकबाकी वसुलीबाबत. |
| परि.क्र.८ | पंचायत समिती अंतर्गत असलेल्या निवासस्थानाबाबत. |
| परि.क्र.९ | विस्तार अधिकारी या पदासाठी असलेल्या निवासस्थानाबाबत. |
| परि.क्र.१० | १२ वा वित्त आयोगातील ४% अनुदानातून केलेल्या कामांवरील प्रदानांतून कार्यकंत्राट कर (Work Contract Tax) व स्वामीत्वधनाची रक्कम वसूल न केलेबाबत. |
| परि.क्र.११ | अर्धसमास पत्राद्वारे मागवण्यांत आलेल्या माहितीबाबत. |
| परि.क्र.१३ | रोखपाल पदासाठी रोख रक्कमा हाताळणीपोटीच्या विशेष वेतनाबाबत. |
| परि.क्र.१४ | जिल्हा निधीच्या सर्वसाधारण रोकडवहीचा ताळमेळ न घेतलेबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परि.क्र.१५ | मुदतबाहय धनादेश प्राप्त करुन रदद न केलेबाबत. |
| परि.क्र.१८ | ग्रामसेवक, प्राथमिक शिक्षकांसाठी बांधलेल्या निवासस्थानाबाबत. |
| परि.क्र.१९ | महापालिका क्षेत्रात असलेल्या मोकळ्या जागांसंदर्भात. |
| परि.क्र.२२ | जामीन कदबे आणि नोंदवहीबाबत. |
| परि.क्र.२३ | दलित वस्ती सुधार योजनेत घेतलेल्या कामांबबत. (पंरास प्रस्तावित) |
| परि.क्र.२४ | जवाहर विहीरींबाबत. (पंरास प्रस्तावित) |

| | |
|---|---|
| परि.क्र.२५ | अपूर्ण बांधकामाबाबत (कृषि उपविभाग, नाशिक) (पंरास प्रस्तावित) |
| परि.क्र.२६ | अपूर्ण बांधकामाबाबत (लघुपाटबंधारे उपविभाग, नाशिक) (पंरास प्रस्तावित) |
| परि.क्र.२७ | अग्रीम नोंदवही अपूर्ण असलेबाबत. |
| परि.क्र.२९ | लेख्यांची स्थिती. |
| परि.क्र.३१ | अनुपालन व पोहोच. |

टिप :- उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या त्या वर्षाच्या पुढील अभिप्रायांमध्ये नमुद केलेले आक्षेप क्रमांकच अंतीम समजण्यात यावेत.

---

## भाग दुसरा
## (चालु लेखा परीक्षण )

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( अ ) खालील अनियमितता.

(जे प्रदान वैधानिक तरतुदी विरुध्द करण्यांत आले आहे असे प्रदान)

---

### परिच्छेद क्रमांक १ :- अंदाजपत्रकाबाबत

पंचायत समिती, नाशिकचे सन २००७-२००८ चे मुळ अंदाजपत्रक पंचायत समिती ठराव क्रमांक १ दिनांक २२.२.२००७ व सुधारीत अंदाजपत्रक ठराव क्रमांक ६४ दिनांक २१.१.२००८ ने मंजूर केले आहे. प्रत्येक शिर्षाखाली केलेल्या तरतुदीचा व खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(आकडे रुपयांत)

| अ. क्र. | शिर्षक | एकुण सुधारीत तरतुद | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४ बांधकाम | १,५०,४०६ | २२,६८७ | १,२७,७१९ | -- |
| २ | ६ सार्वजनिक आरोग्य | ३०,००० | ० | ३०,००० | -- |
| ३ | ९ सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी | ८०,००० | ० | ८०,००० | -- |
| ४ | ११ शेती | ९५,००० | ९४,३५० | ६५० | -- |
| ५ | १२ पशुसंवर्धन | ३०,००० | २९,९९२ | ८ | -- |
| ६ | १४ समाजकल्याण | ९०,००० | ९०,००० | ० | -- |
| ७ | २० संकिर्ण महिला व बालकल्याण | ४५,००० | ० | ४५,००० | -- |
|  | हगणदारीमुक्त बक्षिसे | ० | ० | ० | -- |
|  | शिक्षण | २०,००० | ० | २०,००० |  |
|  | **एकूण** | **५,४०,४०६** | **२,३७,०२९** | **३,०३,३७७** | -- |

यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) सन २००७-२००८ ची सुरवातीची शिल्लक रक्कम रुपये ३,११,५०५/- व जमा रक्कम रुपये २,२८,९०१/- अशी एकूण रक्कम रुपये ५,४०,४०६/- उपलब्ध असतांना खर्च रक्कम रुपये २,३७,१२९/-, म्हणजेच रक्कम रुपये ३,०३,२७७/- ने कमी केलेला आहे. याबाबत उचित स्पष्टीकरण व्हावे.

२) सार्वजनिक आरोग्य व सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी या बाबींवर तरतुद करुनही खर्च करणेत आलेला नाही, तर इतर विभागांवर तरतुदीपेक्षा कमी खर्च केला आहे. यांबाबत पंचायत समिती सभेचे क्षमापन घ्यावे.

तसेच महिला व बालकल्याण, शिक्षण याबाबींवर तरतुद करुनही खर्च केलेला नाही, याबाबत शासनाचे क्षमापन घेण्यात यावे.

---

**परिच्छेद क्रमांक २ :- अनुदान शिल्लक नसतांना खर्च नोंदविलेबाबत.**

सन २००७-२००८ वर्षात खालीलप्रमाणे प्राप्त अनुदानापेक्षा जादा खर्च नोंदविलेला असल्याचे आढळून आले.

(आकडे रुपयांत)

| अ.क्र. | तपशिल | प्राप्त अनुदान | नोंदवलेला खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | २ सामान्य प्रशासन, ९ सि.डी.पी. प्र.भ.देयक | १,३५,००० | १,८५,३३९ | ५०,३३९ |
| २ | २० संकीर्ण प्र.भ. देयक | १,००,००० | १,९७,१३३ | ९७,१३३ |
| | | | **एकुण** | **१,४७,४७२** |

उपरोक्त नमुद जादा खर्चावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ११० ते ११८ मधील तरतुदीनुसार मंजुर अनुदानापेक्षा जादा खर्च करणे अनियमित आहे. जादा खर्चाबाबत संबंधिताची जबाबदारी निश्चित करण्यांत यावी व सदरचे अनुदान प्राप्त करुन अनुपालन दाखवावे.

तसेच भविष्यात सदरचे अनुदान प्राप्त न झाल्यास ते संबंधिताकडून वसुलपात्र राहील.

२) उपरोक्त नमुद खर्चापैकी धनादेश क्रमांक २५९५८३/३१.३.२००८ रुपये ५०,३३९/- व धनादेश क्रमांक २५९५९५/३१.३.२००८ रुपये २४,१३५/- हे माहे नोव्हेंबर २००८ पर्यंत न

वटविणे ही बाब निश्चितच संशयास्पद आहे. सदरचे धनादेश रदद करुन लेख्यांत योग्य ती दुरुस्ती करण्यांत यावी व अनुपालन लेखापरीक्षास दाखविण्यांत यावे.

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( ब ) खालील अनियमितता.

(कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे किंवा गैरवर्तणुकीमुळे झालेले नुकसान)

---

**परिच्छेद क्रमांक ३ :- पंचायत समिती अंतर्गत असलेल्या निवासस्थानाबाबत.**

पंचायत समिती निवासस्थांच्या नोंदवहीची पडताळणी केली असता १ ते ८ निवासस्थानांपैकी अनुक्रमांक ६ व ८ ची निवासस्थाने पंचायत समिती मधील कर्मचा-यांना व उर्वरीत निवासस्थाने जिल्हा परिषदेच्या कर्मचा-यांना राहणेसाठी दिलेली आहेत. ह्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत:

१) अनुक्रमांक ६ व ८ मध्ये राहणा-या कर्मचा-यांच्या वेतन देयकांची पडताळणी केली असता या कर्मचा-यांचे वेतनात १५% दराने घरभाडे रक्कम आहरीत करुन एकूण वजाती रक्कमेत ही घरभाडे रक्कम कपात करुन खालीलप्रमाणे जिल्हा परिषद लेखाशिर्षाखाली भरणा केल्याचे आढळून आले आहे.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव | विभाग | घरभाडे रक्कम रुपये (१५% दराने १.४.२००७ ते ३०.११.२००७ अखेर) |
|---|---|---|---|
| १ | निवासस्थान क्रमांक ६ श्री. शिंदे डी. एस. | लघुपाटबंधारे | ६८६ × ८ = ५,४८८/- |
| २ | निवासस्थान क्रमांक ८ श्री. मिलिंद आर. शिंदे | लघुपाटबंधारे | ७८८ × ८ = ६,३०४/- |
| | | | **एकूण** ११,७९२/- |

अशाप्रकारे वेतन देयकाद्वारे १५% घरभाडे रक्कम आहरीत करुन जिल्हा परिषद सदरी भरणा करणे अनियमित आहे. निवासस्थान पुरविल्यानंतर कर्मचा-यास घरभाडे रक्कम देणे अनुज्ञेय नाही. त्यामुळे लेखापरीक्षण वर्षात शासकीय निधीचे रुपये ११,७९२/- चे नुकसान करुन ती रक्कम जिल्हा परिषद उत्पन्नात जमा केल्याने जिल्हा परिषद निधीचा तेवढा फायदा झाला आहे. जिल्हा परिषद सदरी भरणा असलेली सन

२००७ - २००८ ह्या वर्षातील रक्कम रुपये ११,७९२/- जिल्हा परिषद निधीतून शासन सदरी भरणा केल्याचे अनुपालन दाखवावे.

२) उपरोक्त अनियमित कार्यवाही करतांना संबंधित कर्मचा-यांकडून अनुक्रमे रुपये १,२४६/- व रुपये १,२९३/- अनुज्ञप्ती शुल्कासह भरणा १५ संकीर्ण खाली केला आहे. (नोंव्हेबर २००७ पर्यंत)

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक घभाव-२०००/प्र.क्र.९७/२०००/सेवा-५ मुंबई दिनांक १७.२.२००१ नुसार अनुज्ञेय चटईक्षेत्र चौ.फुट ७५१-१११० साठी अनुज्ञप्ती शुल्क रुपये ७००/- व सेवा शुल्क रुपये १५०/- एकूण रुपये ८५०/- वसुल करणे आवश्यक आहे. तथापि खालीलप्रमाणे अनुज्ञप्ती शुल्क व सेवाशुल्काची रक्कम कमी वसुल केली आहे.

| **कर्मचा-यांचे नाव** | **वसुल रक्कम रु.** | **कमी वसुल केलेली रक्कम रु.** |
|---|---|---|
| निवासस्थान क्रमांक ६ | ५२० | ८५० - ५२० = ३३० X १२ = ३,९६०/- |
| निवासस्थान क्रमांक ८ | ५६० | ८५० -५६० = २९० X १२ = ३,४८०/- |
| | | **एकूण ७,४४०/-** |

वरीलप्रमाणे रक्कम संबंधितांकडून वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

वसुलपात्र रक्कम रुपये १९,२३२/-

---

**परिच्छेद क्रमांक ४ :- ग्रामपंचायत विभागाकडील प्रलंबित खास प्रतिवृत्तातील अपहारीत रक्कमेबाबत.**

या अहवालासोबतचे परिशिष्ट क्रमांक " १ " नुसार ग्रामनिधी, एन.आर.पी., ज.रो.यो, संपूर्ण रोजगार योजना निर्धीच्या अफरातफरीच्या एकूण प्रकरणे ३७ असून त्यामधील खालीलप्रमाणे नमुद रक्कमा वसूल करणे बाकी आहे.

(आकडे रुपयांत)

| **तपशिल** | **अपहारीत रक्कम** | **वसुल केलेली** | **वसुल होणे बाकी** |
|---|---|---|---|
| ग्रामनिधी | २,५६,७१९ | ५८,९२७ | १,९७,७९२ |
| एन.आर.इ.पी.ज.रो.यो, संपूर्ण रोजगार योजना | ९,८९,७३७ | ५३,२८० | ९,३६,४५७ |
| **एकूण -** | **१२,४६,४५६** | **१,१२,२०७** | **११,३४,२४९** |

सदरच्या अपहारीत रक्कमांच्या प्रकरणांशी संबंधित बहुतांशी कर्मचारी सेवानिवृत्त तसेच मयत झाले असल्याने त्या रक्कमां वसूलीबाबत काहीही नियोजन केलेले दिसून येत नाही. तसेच नाहरकत प्रमाणपत्र देणा-यांसह योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक पंरास-२००५/प्र.क्र.२६२/पंरास दिनांक ३.९.२००५ नुसार अपहाराची रक्कम वसूल करणे व संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे. तथापि अपहार व गैरव्यवहाराबाबत बहुतांशी प्रकरणी वेळीच योग्य ती कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. शासनाच्या आदेशाचा त्यामुळे भंग झालेला आहे.

वरील तृटींमुळे एकूण अपहारीत रक्कम वसूल न झाल्याने शासनाचे नुकसान झालेले आहे. याबाबत जबाबदारी निश्‍चित करुन उचित प्रशासकीय कार्यवाही करावी. या गंभीर अनियमिततेबाबत शासनाचे क्षमापन घ्यावे व त्यावरील कार्यवाही अहवालासह अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

---

## परिच्छेद क्रमांक ५ :- तालुका मास्तर यांचे रोखवहीतील अनियमितता

तालुका मास्तर यांचे रोखवहीची पडताळणी केली असता, खालीलप्रमाणे अनियमितता आढळुन आल्या.

१) रोखवहीनुसार दिनांक ३१/०३/२००८ रोजी अखेर शिल्लक रक्कम रु. १६,८३,४५१/-असुन, सदर शिल्लक रक्कम कशाची आहे हे मोघम स्वरुपात नमुद केलेले आहे. तालुका मास्तर यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता १९६८ चे नियम ५०(२) व ७७(३) नुसार सन २००७-०८ या कालावधीत दरमहा शिल्लक रक्कमेचा गोषवारा नमुद करुन तीन महिन्याचे वरील असंवितरीत रकमा पंचायत समितीकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि याप्रमाणे गोषवारे नमुद केलेले नसल्याने तीन महिन्यावरील शिल्लक रक्कम ही कोणाची, कधीपासुन व किती शिल्लक आहे, याची पडताळणी करता आली नाही व तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधीवरील शिल्लक रक्कमेचा तपशिल समजु शकत नाही. सदर शिल्लक रक्कमांचा अद्ययावत गोषवारा नमुद करुन तपासणीस उपलब्ध करण्यात यावां. दरमहा प्राप्त अनुदान, खर्च व शिल्लक (गोषवारे नमुद करुन) याचा मेळ घेऊन अनुपालन लेखापरिक्षणांस दाखविण्यांत यावे, तसेच तीन महिन्यांतील असंवितरीत रक्कम भरणा करावयात.

वेळीच नियमानुसार कार्यवाही न करणेबाबत संबंधीताची जबाबदारी निश्‍चित करण्यात यावी व नियमानुसार कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखविण्यात यावे.

२) रोखवहीत बॅंकमेळपत्रक तयार करण्यांत आलेले आहे, तथापी न वटलेल्या धनादेशांच्या तारखा नमुद नाहीत. त्यामुळे मुदतबाह्य धनादेश असल्यास त्याची पडताळणी करता आली

नाही. तरी सदरच्या तारखा नमुद करुन मुदतबाहय धनादेश असल्यास त्यावर लेखा संहिता नियम ३१ नुसार कार्यवाही करण्यांत यावी.

वरीलप्रमाणे पुर्तता करुन अनुपालन लेखापरिक्षणांस सादर करण्यांत यावे.

---

**परिच्छेद क्रमांक ६ :- संगणकाचे सी.पी.यु./इन्व्हेटर/बॅटरी चोरीबाबत.**

पंचायत समिती, नाशिक येथील सामान्य प्रशासन विभागाचे दि. १०.७.२००८ रोजी ३ नग सी.पी.यु. व दिनांक १०.९.२००८ रोजी १ नग सी.पी.यु. / इन्व्हेटर व २ नग बॅटरी अशी दोन वेळेस चोरी झालेली असून त्याबद्दल पोलीस स्टेशनला दिनांक ११.७.२००८ व ११.९.२००८ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे. जडसंग्रह नोंदवहीनुसार त्याचे तपशिल खालीलप्रमाणे आढळून आले.

| अ. क्र. | जडसंग्रह नोंदवही क्रमांक | पृष्ठ क्रमांक | किंमत | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | १ | ९६ | ३४,६८१ | दि. ३०.८.२००० रोजी आमदार निधीतून १ नग संगणक खरेदी |
| २ | १ | ९७ | ३०,४२० | दि. ३१.१२.२००२ रोजी मु.का.अ. यांचेकडून २ नग संगणक खरेदी |
| ३ | २ | १५ | - | दि. १२.९.२००७ रोजी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून प्राप्त |
| | | एकूण | ६५,१०१ | |

उपरोक्त नमुद चोरीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

१) वरीलप्रमाणे ३ नग सी.पी.यु.चे चोरीपासून सुमारे रुपये ६५,१०१/- चे नुकसान झालेले आहे.

२) अ.क्र. ३ नुसार चोरी झालेल्या वस्तुची रक्कम जडसंग्रह नोंदवहीत नमुद नाही. त्यामुळे झालेले नुकसान समजून येत नाही.

३) पोलीस स्टेशनचे दिनांक १०.७.२००८ चे एफ.आय.आर. (गुन्हा नोंद) नुसार ३ नग सी.पी.यु. चे फक्त रुपये ३,०००/- चे नुकसान झालेले दर्शविले आहे. प्रत्यक्षात किंमत सुमारे रुपये ६५,१०१/- चे नुकसान झाल्याचे दिसून येते. याबाबत सुधारीत व अचुक नुकसानीची नोंद गुन्हा नोंद (एफ.आय.आर.) मध्ये होणे आवश्यक असून, योग्य ती कार्यवाही करुन अनुपालन दाखवावे. तसेच दिनांक ११.९.२००८ ची गुन्हा नोंद (एफ.आय.आर.) प्रत पंचायत समितीला प्राप्त झालेली नाही ती प्राप्त करुन लेखापरीक्षणांस उपलब्ध करण्यात यावी.

४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता नियम १९६८ चे नियम ३६ नुसार चोरीमुळे झालेल्या नुकसानीचा सविस्तर अहवाल उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांना पाठविण्यांत आलेला नाही. नियमानुसार अहवाल सादर करण्यांत यावा व झालेल्या अनियमिततेस सक्षम अधिका-यांचे क्षमापन घेण्यांत यावे.

५) चोरी झालेल्या वस्तुंचा विमा काढण्यांत आलेला नाही. त्यामुळे झालेल्या नुकसानीपोटी विमा भरपाई मिळू शकत नाही. याबाबत जबाबदारी निश्चित करुन आर्थिक नुकसानीची रक्कम वसूल करावी.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यांत यावे.

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( क ) खालील अनियमितता.

(एखाद्या व्यक्तीस तिला मिळालेली रक्कम लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक होते, परंतु जी दाखविण्यांत आली नाही अशी रक्कम )

---

### परिच्छेद क्रमांक ७ :- निवासस्थान अनुज्ञप्ती शुल्क थकबाकी वसुली न केलेबाबत.

पंचायत समिती आवारामधील निवासस्थांनांत राहत असलेल्या कर्मचा-यांकडून खालीलप्रमाणे अनुज्ञप्ती शुल्कापोटी थकबाकी वसुल होणे बाकी आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | कालावधी | थकबाकी रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | श्री. एन.एम.बहिरम | ७/२००२ अखेर | ५,१६० |
| २ | श्री. आर.डी.जवळेकर | ६/१९९२ अखेर | २,४३७ |
| ३ | श्री. खाडीलकर | ७/१९९२ अखेर | ५२० |
| ४ | श्री. डी.के.काकळीज | ३/२००२ अखेर | १०,०३० |
| ५ | श्री. श्री. के. गुरव | ३/१९९२ अखेर | १,७५८ |
| ६ | श्री. अे.जे.कडवे | ८/२००० अखेर | १५,९८० |
| ७ | श्री. अेम.जी.गुरव | ६/१९९१ अखेर | १,९१० |
| ८ | श्री. एस.पी.वसावे | १०/१९९२ अखेर | २,८१५ |
| ९ | श्री. डी.टी.तडवी | ८/१९९६ अखेर | १०,६६० |
| १० | श्री. टी. टी. सोनवणे | ९/२००१ अखेर | ७,१९५ |
| ११ | श्री. एस.के. गायरणे | ३/२००२ अखेर | ६,६४६ |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | श्री. टी. वाय. जाधव | ८/१९९८ अखेर | १३,५०० |
| १३ | श्रीमती. एम. के. शेख | ३/२००२ अखेर | ६,७४५ |
| १४ | श्री. एम. पी. शिंदे | ३/२००२ अखेर | ४,००१ |
| | | **एकूण** | **८९,३५७** |

उपरोक्त नमुद कर्मचा-यांकडून २००७ - २००८ अखेर रुपये ८९,३५७/- ची थकबाकी वसुल होणे बाकी आहे. ह्या संदर्भात लेखापरीक्षण अहवाल सन २००१ - २००२ चा परिच्छेद क्रमांक ८ पंचायत राज पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ आहे. तसेच सदर थकबाकी वसुल करणेबाबत मागिल लेखापरिक्षण अहवाल सन २००६ - २००७ मधे आक्षेप क्रमाक ७ नोदवुनही काहीही कार्यवाही केलेली नाही. तरी सदरची थकबाकी दंडनीय व्याजासह वसुलीबाबत ठोस कार्यवाही करण्यांत यावी. संपुर्ण रक्कम वसुल करुन अनुपालन लेखापरिक्षणास दाखविण्यांत यावे.

वसूलपात्र रक्कम रुपये ८९,३५७/-

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( ड ) खालील अनियमितता.

(उपरोक्त अ, ब व क शिवाय इतर आक्षेप)

---

**परिच्छेद क्रमांक ८ :- प्रलंबित अग्रिम रक्कमेबाबत.**

पंचायत समिती नाशिकचे सन २००७-०८ चे लेखापरीक्षणामध्ये अग्रिम नोंदवहीची पडताळणी केली असता विवरणपत्र क्रमांक ३ (अ) नुसार कर्मचा-यांकडील धान्य, सण, खातेनिहाय अग्रिम रक्कम रुपये ६,५८,५६७/- प्रलंबित असलेचे निदर्शनास येते.

विवरणपत्रातील नमुद रक्कमेपैकी रुपये ६३,८७५/- ही सन २००५ - २००६ पासून प्रलंबित असून, ग्रामविकास विभागाकडील शासन परिपत्रक क्र. पंरास-६९२/झेडपीए/ ४०९/प्र.क्र.१३७६/दिनांक १०.६.१९९२ नुसार कार्यवाही करुन सदरची रक्कम वसूल करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

देण्यांत आलेल्या अग्रिम रक्कमेची वसूली / समायोजन वेळीच होणे आवश्यक आहे. अग्रीम रक्कमांची वसूली वेळीच न झाल्यास जबाबदार असणारे अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द उचित कार्यवाही करुन त्यांचेकडून ही रक्कम वसूल करावी.

---

**परिच्छेद क्रमांक ९ :- अनामत नोंदवहीबाबत.**

पंचायत समिती, नाशिककडील सन २००७ - २००८ चे अनामत नोंदवहीची पडताळणी केली असता, अहवालासोबत विवरणपत्र क्रमांक ३ (ब) मध्ये नमुद केल्याप्रमाणे दिनांक ३१.३.२००८ अखेर एकूण अनामत रक्कम रुपये ९३,४१,९६१/- शिल्लक आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम २१९ अन्वये ३ वर्षाच्या वरील मुदतीच्या अनामत ठेवीच्या रक्कमा व्यपगत करणे आवश्यक असतांना वरील नमुद केलेली सन २००३ - २००४ ते २००४ - २००५ ची अनामत रक्कम रुपये १,७८,७२६/- व्यपगत केली नाही. तरी याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे क्षमापन घेऊन योग्य त्या कार्यवाहीसह पुर्तता दाखवावी.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम २२० अन्वये ३ वर्षापर्यंत अदा न केलेल्या व व्यपगतही न केलेल्या रुपये १,७८,७२६/- वरील अनामत रक्कमांचे विवरण मा. उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, नाशिक यांचेकडे दिनांक ३१.३.२००८ पूर्वी पाठविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे सन २००३ ते २००५ ची माहिती पाठविण्यांत आलेली नाही. याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे क्षमापन घेऊन योग्य ती कार्यवाही केल्याचे लेखापरीक्षणास दाखवावे.

तसेच उपरोक्त नमुद अनामत सदरीच्या रक्कमा संबंधित शिर्षाखाली भरणा करुन अनुपालन दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १० :- रोखपाल पदासाठी रोख रक्कमा हाताळणीपोटीच्या विशेष वेतनाबाबत.**

पंचायत समिती, नाशिक यांचेकडील रोखपाल रोखवहीची पडताळणी केली असता, शासन निर्णय, क्र. डीडीओ-१००५/प्र.क्र.५ कोष-प्रशा/५ मुंबई दिनांक २९.८.२००५ अन्वये माहे डिसेंबर-०६ पासून सर्व कर्मचा-यांचे वेतन व भत्ते बँकेमार्फत करण्याच्या कार्यपध्दतीमुळे रोखपाल यांना मासिक वेतनासोबत रु. ३००/- रोख रक्कमा हाताळणीसाठीचे विशेष वेतन अनुज्ञेय नसतांना अदा केल्याचे आढळले.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, निर्णय क्रमांक वेतन १२९८/प्र.क्र.१६/९८/सेवा-३, मुंबई दि. २३.१२.१९९८ नुसार किमान रुपये ५०,०००/- वरील रोख रक्कम हाताळणीबाबत विशेष वेतन १५०/- अनुज्ञेय आहे.

उपरोक्त नमूद अभिप्रायांनुसार सर्व कर्मचा-यांचे वेतन बँकेमार्फत होत असल्याने रुपये ३००/- विशेष वेतना ऐवजी रुपये १५०/- विशेष वेतन देय होते. त्यामुळे

रुपय १५०/- प्रमाणे माहे एप्रिल २००७ ते मार्च २००८ या कालावधीसाठी एकूण रुपये १,८००/- वसुल करावेत व हयापुढील महिन्यात याप्रमाणे कारवाई केल्याचे अनुपालन दाखवावे.

वसुलपात्र रक्कम रुपये १,८००/-
पंचायत समिती, नाशिक

---

**परिच्छेद क्रमांक ११ :- मुदतबाहय धनादेश प्राप्त करुन रदद न केलेबाबत.**

अभिकरण योजना व जिल्हानिधीची रोखवही तपासली असता दि. ३१.३.२००८ अखेर सोबतच्या परिशिष्ट क्रमांक २ नुसार काही धनादेश एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी न वटल्याचे स्पष्ट झाले.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ३१ अन्वये असे न वटलेले मुदतबाहय धनादेश प्राप्त करुन रद्य करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही न करणा-या संबंधितांवर उचित प्रशासकीय कारवाई करावी व सदरचे धनादेश रद्य करुन रक्कमा योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा केल्याचे अनुपालन लेखा परीक्षणांस दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १२ :- दैनंदिन्या सादर नसतांना वेतन व भत्ते अदा केल्याबाबत.**

पंचायत समिती, नाशिक येथील सन २००७-०८ चे लेखापरीक्षण केले असता ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक, विस्तार अधिकारी, कृषी अधिकारी आदि क्षेत्रीय फिरत कर्मचा-यांना दरमहा वेतन व भत्ते अदा करतांना त्यांच्याकडून दैनंदिन्या प्राप्त झालेल्या नसल्याचे दैंनदिन आवक व मंजूरी नोंदवहीवरुन दिसून आले.

सोबत जोडलेले परिशिष्ट क्र. ३ नुसार काही ग्रामसेवकांची पुर्ण वर्षात एकाही महिन्याची दैनंदिनी प्राप्त झालेली नाही. तसेच इतर ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांच्या दैनंदिन्यांच्या नोंदी नोंदवहीत घेण्यांत आलेल्या नाहीत.

परिशिष्टात नमुद केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या दैनंदिन्या सादर नसतांना वेतन व भत्ते अदा केलेले आहेत. याबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन, अदा केलेले वेतन व भत्ते बरोबर असल्याची खात्री करावी व तसे प्रमाणित करुन अनुपालन सादर करावे.

---

**परिच्छेद क्रमांक १३ :- निवृत्ती वेतन प्रदान नोंदवही अपूर्ण असणेबाबत.**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ३९ परिशिष्ट ४ मधील नियमान्वये पंचायत समितीत येणा-या प्रत्येक मागणी बिलाची व

नोंदवहीची गट विकास अधिकारी यांनी प्रदान आदेशावर सही करण्यापूर्वी कनिष्ठ लेखा अधिका-यांकडून तपासणी होणे आवश्यक आहे.

पंचायत समिती, नाशिक यांचेकडील गटशिक्षण अधिकारी यांचे कार्यालयांतील निवृत्ती वेतन देयके, निवृत्ती वेतन लेखापरीक्षण नोंदवही (ए.पि.पि.९) आणि उपदान व अंशराशीकरण नोंदवही (नमुना ए.पी.पी. १०) यांची तपासणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे अपूर्णता व तृटी आढळून आलेल्या आहेत.

१. नमुना ए.पी.पी. ९ मधील लेखा परीक्षण नोंदवहीत निवृत्ती वेतनाचा प्रकार, निवृत्ती वेतन सुरु झाल्याचा दिनांक, अशंराशीकरण केलेली रक्कम व प्रदानाचा दिनांक, मुळ निवृत्ती वेतन, अशंराशीकरणानंतरची रक्कम, महागाई भत्त्याचे दर, मासिक एकत्रित निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाचे दर, निवृत्ती वेतनधारक मृत्यू पावल्यास मृत्यूची नोंद, वारसांची नोंद, प्रत्येक महिन्यांत किती निवृत्ती वेतन प्रदान केलेले याची नोंद व तपासणी केल्याबद्दल लेखाधिकारी यांची स्वाक्षरी, जिवीत प्रमाणपत्राची नोंद, पुनर्विवाहाची / पुनर्नियुक्तीची नोंद, वयांची ६५ वर्षे पूर्ण किंवा मृत्यूनंतर ७ वर्षे यांपैकी जे अगोदर घडले असेल इत्यादी संबंधीच्या तारखा, मृत्यूनंतरच्या जादा प्रदान केलेल्या रक्कमा बँकेकडून परत मागवून शासन सदरी भरणा केल्याबद्दलच्या चलनासह नोंदी, अशंराशीकरणानंतर १५ वर्षांनी पुनर्स्थापना केल्याबाबतच्या नोंदी, चौथ्या, पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत निवृत्ती वेतन आदेशाप्रमाणे सुधारीत निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाच्या नोंदी बँकेचे नाव व खाते क्रमांक इत्यादी नोंदी परिपूर्ण घेण्यांत आलेल्या नसल्यामुळे निवृत्ती वेतन धारकांस / कुटूंब निवृत्तीवेतनधारकांस योग्य प्रदान झाले किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणांत परिपूर्ण पडताळणी करता आलेली नाही.

२. बँकेमार्फत निवृत्तीवेतन घेणा-या निवृत्तीवेतनधारकास प्रत्येक वर्षी जीवीत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जीवीत प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास त्या निवृत्ती वेतन धारकास निवृत्ती वेतन प्रदान करण्याचे थांबवावे, असे नियम असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे तपासणी आढळून आलेले नाही.

३. नियम ८० अन्वये ज्या कुटूंब निवृत्तीवेतनधारकाचे निवृत्ती वेतन विवाहानंतर व पुनर्विवाहानंतर बंद होणार आहे. त्यांच्याकडून नमुना ए.पी.पी. १४ मध्ये दर सहामाहीस प्रतिज्ञापत्र मागविण्यांत येऊन ते डिसेंबर व जून मध्ये देय होणा-या निवृत्ती वेतन बिलासोबत जोडण्यांत यावे. असे प्रमाणपत्र देण्यात कसून झालेल्या प्रकरणांचे सविस्तर विवरण जानेवारी व जूलै महिन्यांत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचकडे सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

४. निवृत्ती वेतन आदेशांत निवृत्ती वेतन धारकांचे फोटो, स्वाक्षरीचे नमुने, सुधारीत निवृत्ती वेतनाचे आदेश इत्यादी प्रकारचे अत्यावश्यक कागदपत्रे नस्तीबध्द केलेली नाहीत.

५. निवृत्ती वेतन बिल, निवृत्ती वेतन प्रदान आदेश व निवृत्त वेतन लेखा परीक्षा नोंदवहीतील नोंदी यामध्ये संदर्भिय नोंदवही क्रमांक, पृष्ठ क्रमांक यांची नोंद घेण्यात

आलेली नाही. त्यामुळे संदर्भाकिंत लेखे तपासणीस लेखा परीक्षणात बराच कालावधी व श्रम व्यर्थ खर्च करावे लागत आहेत.

सदरचे नमुना ए.पी.पी. ९ व इतर अभिलेखे वेळीच पूर्ण न केल्याने योग्य प्रदाने झाल्याची पडताळणी लेखापरीक्षणांस करता आली नाही. या महत्त्वाच्या नोंदवह्या अपूर्ण ठेवणे ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. याबाबत संबंधित कर्मचारी व अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करावी.

उपरोक्त आक्षेपांबाबत अंतर्गत लेखापरीक्षणाकडून उचित पडताळणी करुन त्यांचा अहवाल व त्यावरील कार्यवाही अहवालासह निवृत्ती वेतन लेखा परीक्षा नोंदवही व सर्व आदेश नोंदवहीसह अद्ययावत पुर्तता लेखापरीक्षणांस दर्शवावी.

---

**<u>परिच्छेद क्रमांक १४ :- परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू न केलेबाबत.</u>**

पंचायत समिती, नाशिक सन २००७ – २००८ च्या लेखापरीक्षणात शिक्षण आस्थापना लेख्यांची तपासणी केली असता, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी कंत्राटी / मानधनावर लागलेल्या परंतु १ नोव्हेंबर २००५ नंतर कायम केलेल्या, या अहवालासोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक ४ नुसार नमुद कर्मचा-यांना जिल्हापरिषद, नाशिक यांनी भविष्य निर्वाह निधी क्रमांक दिलेला आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो १००५/१२६/सेवा-४/दिनांक ३१ ऑक्टोंबर २००५ व शासन निर्णय क्रमांक अंनियो १००७/१८/सेवा-४/ दिनांक ७ जुलै २००७ अन्वये जे कर्मचारी १ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत कायम करण्यात आले त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ लागु होत नाही. त्यामुळे परिशिष्टात नमुद केलेल्या कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये होणारी कपात ही चुकीची असून, त्यांना उपरोक्त शासन निर्णयानुसार स्तर १ लागु होतो. त्यात त्यांची मुळ वेतन + महागाई वेतन + महागाई भत्ता या रक्कमेच्या १० टक्के रक्कम कपात करुन ठेव या शिर्षाखाली जमा करावयाची आहे.

२) जे कर्मचारी १ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत कायम करण्यात आले त्यांच्याबाबत अद्यापही परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेची रक्कम कपात करण्यात येत नसल्याने याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे कर्मचा-यांचे शासन निर्णयानुसार परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे अंशदान कपात करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

शिक्षण विभाग आस्थापना

---

**परिच्छेद क्रमांक १५ :- शिक्षणसेवक पदावरील नियुक्तीचे वेळी जात पडताळणी प्रमाणपत्र घेतले नसल्याबाबत.**

पंचायत समिती नाशिकचे सन २००७-०८ चे लेखापरीक्षणामध्ये पडताळणी केली असता खालील शिक्षण सेवकांचे जातपडताळणीचे पत्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही, असे आढळून आले.

सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक “ ५ ” मधील कर्मचा-यांची जात वैधता प्रमाणपत्रे पंचायत समितीकडे अप्राप्त आहेत. जातीचे प्रमाणपत्राची पडताळणी सक्षम प्राधिकरणाकडून करुन घेण्याची व वैधता प्रमाणपत्र, नियुक्तीच्या दिनांकापासुन ३ महिन्याचे आत गटशिक्षण अधिकारी यांना सादर करणे बंधनकारक राहील व मुदतीत प्रमाणपत्र सादर न केल्यास नियुक्ती आपोआप रदद समजण्यात यईल असे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी दिलेल्या नियुक्ती आदेशांमध्ये स्पष्टपणे नमुद केले आहे. त्याच आदेशात प्रतिलिपी-२ नुसार गटविकास अधिकारी व गटशिक्षण अधिकारी यांना निर्देशित केले आहे की, संबंधिताच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी संबंधित कार्यालयाकडून करुन घेण्याची जबाबदारी त्यांची राहील.

नियुक्ती आदेशातील २(ड) प्रमाणे नियुक्त उमेदवारांनी तीन महिन्याचे आत त्यातील जबाबदारी विषयक तपशिलाचा व अद्यापपर्यंत वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही. असे असतांनाही त्यांची नियुक्ती आपोआपच रदद न होता अद्यापही कायम का ठेवण्यात आली. नियुक्ती रदद करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनाच असतांना, नियुक्तीनंतर तीन महिन्यात संबधितांनी कागदपत्रे सादर न केल्याने गटविकास अधिकारी / गटशिक्षण अधिकारी यांनी तात्काळ तसा अहवाल मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करणे आवश्यक होते. मात्र तशी कार्यवाही गटशिक्षण अधिकारी / गटविकास अधिकारी यांनी पार पाडलेली नाही. तसेच भविष्यात संबंधित कर्मचारी यांची नेमणूक अवैध ठरल्यास त्यांना अदा केलेले वेतन व भत्ते संबंधित कर्मचारी / अधिकारी यांचेकडून वसूलीस पात्र राहील याची नोंद घेण्यांत यावी. याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात येऊन उचित प्रशासकीय कारवाई व्हावी.

वरील प्रमाणे प्रशासकीय कार्यवाही अहवालासह आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखविण्यात यावी.

---

**परिच्छेद क्रमांक १६ :- विस्तार अधिकारी या पदासाठी असलेल्या निवासस्थानाबाबत.**

बांधकाम विभागाकडील मालमत्ता नोंदवहीची पडताळणी केली असता ह्या नोंदवहीत पंचायत समिती आवारामधील असलेली अनुक्रमांक १ ते ४ ही निवासस्थाने

७३८ चौ. फुट क्षेत्रफळाची, विस्तार अधिकारी या पदनामासाठी राखीव असल्याचे स्पष्ट झाले.

प्रत्यक्षात सदरची निवासस्थाने जिल्हा परिषदेच्या संबंधित विभागाने इतरत्र कर्मचा-यांना दिली आहेत. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. घभाभ/१०८८/८०५/सेवा-५/ दिनांक ३०.५.१९८२ मधील अभिप्राय ४ नुसार ज्या पदासाठी निवासस्थानात संबंधित पदावरील कर्मचारी यांनी राहणे बंधनकारक आहे व त्याचे वेतनातून अनुज्ञेय घरभाडे १५% रक्कम संबधितांना प्रदान करणे अनियमित आहे. तथापि, संबंधित विस्तार अधिकारी निवासस्थानात रहात नसून त्यांना अनियमितपणे १५% घरभाडे रक्कम प्रदान केली जाते आहे. ह्याबाबत मागील लेखापरीक्षण अहवाल सन २००६ - २००७ मध्ये आक्षेप क्रमांक ९ नोंदवूनही कार्यवाही करण्यांत आलेली नाही. तरी आवश्यक ती कार्यवाही करुन संबंधितांना यापूर्वी प्रदान केलेली घरभाडे भत्त्याची रक्कम वसूल करुन शासन सदरी भरणा केल्याचे अनुपालन दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १७ :- महापालिका क्षेत्रात असलेल्या मोकळ्या जागांसंदर्भात.**

बांधकाम उपविभाग, नाशिक यांचेकडील मालमत्ता नोंदवहीची पडताळणी केली असता महापालिका क्षेत्रात प्राथमिक शाळांसाठी जागा राखीव असल्याचे आढळून आले.

| अ.क्र. | गावाचे नाव | सर्व्हे क्रमांक | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| १ | आडगाव | २१६/२ | १ एकर ४ गुंठे |
| २ | वडाळे | गावठाण | २ एकर १९ गुंठे |
| ३ | पाथर्डी | ३०७ ब | ५० X ५० |
| ४ | नांदुर दसक | गावठाण | ६० X ६० |
| ५ | पाथर्डी | गावठाण | ५० X ३५ |
| ६ | पाथर्डी | गावठाण | ५६ चौ. |
| | | | (परिमाण नमुद नाही) |

उपरोक्त नमुद गावे महापालिका क्षेत्रात विलीन झालेमुळे त्या त्या गावातील प्राथमिक शाळेसाठीच्या जागा अद्याप हस्तांतरीत झालेल्या नाहीत. याबाबत मागील लेखापरीक्षण अहवाल सन २००६-०७ मध्ये आक्षेप क्रमांक १९ नोंदवुनही कार्यवाही केलेली नाही.

ह्या जागासंदर्भात योग्य ती कायदेशीर कार्यवाही करुन अनुपालन दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १८ :- ग्रामसेवक, प्राथमिक शिक्षकांसाठी बांधलेल्या निवासस्थानाबाबत.**

बांधकाम उपविभाग, नाशिककडील स्थावर मालमत्ता नोंदवहीची पडताळणी केली असता खालील नमुद गावांमध्ये प्राथमिक शिक्षकांसाठी व ग्रामसेवकांसाठी निवासस्थाने बांधलेली असल्याचे आढळून आले.

| अ) प्राथमिक शिक्षक निवासस्थाने | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **गावाचे नाव** | **सर्व्हे क्रमांक** | **चौ. फुट / मीटर** |
| १ | शिंदे | १९९ अ | १०.५० X ३.०५ |
| २ | लाडची | गावठाण | १५ X ३५ |
| ३ | आडगांव | गावठाण | ९.७० X ३.७० |
| ४ | गिरणारे | गावठाण | १३ X ३० |
| ५ | ताईकवाडी | गावठाण | ३२ X ४८ |
| **ब) ग्रामसेवक निवासस्थाने** | | | |
| १ | ता. नाशिक | नमुद नाही | |
| २ | ता. नाशिक | | |
| ३ | ता. नाशिक | | |

ही निवासस्थाने सुस्थितीत असल्याबाबत उपअभियंता यांनी दिनांक ३० जून, २००८ चे वार्षिक पडताळणी प्रमाणपत्रांमध्ये नमुद केलेले असतांनाही ही निवासस्थाने विनावापर ठेवल्यामुळे संबंधित कर्मचा-यांना दिलेल्या घरभाडे भत्त्याच्या व आकारणीयोग्य सेवाकार / अनुज्ञप्ती शुल्काच्या रक्कमांचे निर्धारण करुन, या रक्कमा जबाबदारी निश्चित करुन वसुल कराव्यात. याबाबत मागील लेखापरीक्षण अहवाल सन २००६-०७ मध्ये आक्षेप क्रमांक १८ नोंदवुनही कार्यवाही केलेली नाही. संबंधित कर्मचा-यांना त्यांच्या मुख्यालयी या निवासस्थांनामध्ये राहणे बंधनकारक असल्यामुळे ही निवासस्थाने वापरात आणून पूर्तता दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक १९ :- दलितवस्ती सुधार योजना अपूर्ण कामांबाबत.**

सोबत जोडलेले विवरणपत्र क्रमांक २ नुसार दलितवस्ती सुधार योजनेची एकूण १९ कामे अपूर्ण असून त्यावर रक्कम रुपये १५,६४,६००/- खर्च करण्यांत आलेला आहे. सदरची कामे सन २००५ - २००६ पासून अपूर्ण असल्याचे दिसून येते. सदरची कामे अपूर्ण असल्याने शासननिधी विनावापर गुंतवून पडलेला आहे.

प्रथम मागील जूनी कामे पूर्ण करणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे अपूर्ण कामांवरील खर्च भविष्यांत नैसर्गिक फरकांचा परिणाम होऊन खर्च वाया जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी अपूर्ण कामे प्राधान्य क्रमाने पूर्ण करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखविण्यांत यावे.

---

**परिच्छेद क्रमांक २० :- करारपत्राची नोंदवही न ठेवणेबाबत.**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम १४७ नुसार प्रत्येक मंजूर करारांची नमुना क्रमांक ४८ मध्ये नोंदवही परीरक्षीत करुन त्यामध्ये नोंद घेऊन प्रत्येक नोंदीखाली लेखाधिका-याने स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे पंचायत समितीने आजपावेतो कोणत्या कामासाठी कोणत्या मक्तेदाराबरोबर करार केलेले होते, कराराप्रमाणे विहित वेळेत काम पूर्ण झाले किंवा कसे इत्यादीबाबतची पडताळणी करता आलेली नाही.

तरी आजपावेतो केलेल्या कराराबाबतच्या नोंदी नमुना क्रमांक ४८ मध्ये घेऊन त्या नोंदीखाली सक्षम प्राधिका-याची स्वाक्षरी घेऊन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २१ :- दप्तर तपासणी लक्षांकाबाबत.**

सन २००७ – २००८ वर्षात ग्रामपंचायत विभागाकडील क्षेत्रीय अधिकारी यांना किती दप्तर तपासणीचे लक्षांक देण्यांत आले होते, किती पूर्ण केले, त्यात आढळून आलेल्या गंभीर अनियमितता व केलेली कार्यवाही याबाबत अर्धसमासिय पत्र क्रमांक १ दिनांक ११.९.२००८ अन्वये माहिती मागविण्यांत आली. सदर तपशीलान्वये सोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक “ ६ ” नुसार दप्तर तपासणीचे कमी उद्दिष्ट साध्य पार पडलेले असल्याचे दिसून येते. तसेच आढळून आलेल्या गंभीर अनियमिततेबाबत काय कार्यवाही केली हे नमुद नाही. त्यामुळे केलेल्या कार्यवाही उचित असल्याची खात्री होत नाही.

दप्तर तपासणी हे प्रशासनाच्या प्रभावी नियंत्रणाचा भाग असून जो पूर्ण करणे आवश्यक आहे, जेणेकरुन संभाव्य होणारे अनियमितता, गैरव्यवहार आदि प्रकारांवर वेळीच नियंत्रण ठेवणे शक्य होईल. कमी दप्तर तपासणी साध्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन अनुपालन लेखापरिक्षणांस दाखविण्यांत यावे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक २२ :- जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले नाहीत.</u>**

पंचायत समिती, नाशिकचे सन २००७-०८ कालावधीतील खालील कर्मचा-यांचे जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले घेणेत आलेले नाहीत.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. आर.डी.कसबे | वाहन चालक |
| २ | श्री. पी.डी.पाटील | मिश्रक प्रा.आ.केद्र शिंदे |
| ३ | श्री. एस.एन.वाघ | क.लिपीक प्रा.आ.केद्र शिंदे |
| ४ | श्रीमती. बी.वाय.मोरे | क.लिपीक प्रा.आ.केद्र गिरणारे |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ४३ (३) अन्वये प्रत्येक वित्तीय वर्षाचे सुरुवातीस जामीनदार हयात व लायक असल्याचे दाखले घेणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त नमुद केलेल्या कर्मचा-यांचे जामीनदार हयात व लायक असल्याचे दाखले घेणेत आलेले नाहीत. तरी उपरोक्त नियमाप्रमाणे कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखवावे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक २३ :- जवाहर विहिरींच्या अपूर्ण बांधकामाबाबत.</u>**

पंचायत समिती, नाशिक अंतर्गत सोबतच्या परिशिष्ट क्रमांक “ २(१) ” मध्ये नमुद केल्याप्रमाणे एकूण ६ विहिरींची कामे अद्यापपावेतो अपूर्ण स्थितीत आहेत. सदरच्या अपूर्ण ६ विहिरींच्या कामावर मार्च - २००८ अखेरपावेतो रक्कम रुपये २,००,२६८/- खर्च करण्यांत आलेला आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक जाविका - १२९८/प्र.क्र.१०४/ रोहयो-१० दिनांक १.७.१९९८ मधील परिच्छेद क्रमांक १७ व १८ नुसार विहिरीचे काम प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील दिनांकापासून २ महिन्याचे आत सुरु करुन पुढील १२ महिन्याचे आत काम पूर्ण करावयाचे असतांना त्याप्रमाणे शासनाचे आदेशाचे पालन झालेले नाही. तरी याबाबत शासनाचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

२) नाशिक उपविभागातील एकूण ६ विहिरींचे काम अपूर्ण आहे. सदरील कामे वेळीच पूर्ण झालेली नसल्यामुळे त्यावरील आजपावेतो करण्यांत आलेला खर्च रुपये २,००,२६८/- व्यर्थ जाण्याची शक्यता आहे. याबाबत अवर सचिव, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक ६५ दिनांक १३.९.२००१ अन्वये प्रत्येक लाभार्थ्याकडून

विहित मुदतीत पूर्ण न झालेल्या कालावधीपासून १८% दराने व्याज आकारणीची दंडनीय कारवाई करण्यात यावी.

३) सन २००७ - २००८ मध्ये नविन विहिरींचा लक्षांक दिलेला असतांना त्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. याबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापनासह अनुपालन दर्शवावे.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे. तोपर्यंत रक्कम रुपये २,००,२६८/- शासकीय अनुदानासाठी तात्पुरती अमान्य करण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
जवाहर रोजगार योजना अनुदान
लघुपाटबंधारे विहिरी

---

**<u>परिच्छेद क्रमांक २४ :- कृषि विभाग अपूर्ण विहिरींबाबत.</u>**

सोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक " २(२) " नुसार दिनांक ३१.३.२००८ विशेष घटक योजनेतंर्गत ४ विहिरींची कामे अपूर्ण असून त्या कामांवर रक्कम रुपये ९२,९८६/- खर्च करण्यात आलेला आहे.

सदर खर्चावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

१) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक जाविका - १२९८/ प्र.क्र.१०४/रोहयो-१० दिनांक १.७.१९९८ मधील परिच्छेद क्रमांक १७ व १८ नुसार विहिरीचे काम प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील दिनांकापासून २ महिन्याचे आत सुरु करुन पुढील १२ महिन्याचे आत काम पूर्ण करावयाचे असतांना त्याप्रमाणे शासनाचे आदेशाचे पालन झालेले नाही. यातून प्रशासनाची अकार्यक्षमता स्पष्ट होते.

२) अपूर्ण विहिरीवर शासकीय अनुदान रक्कम रुपये ९२,९८६/- खर्च होऊन सुध्दा योजनेचा हेतू सफल होत नाही. नविन विहिरींच्या कामांना मंजूरी देणेपूर्वी अपूर्ण विहिरी पूर्ण करण्यासाठी प्रयत्न व्हावेत.

उपरोक्त नमुद आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्यात यावे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक २५ :- बांधकाम उपविभाग (इ व द) नोंदवह्यांबाबत</u>**

१) नोंदवही क्रमांक ३९ :- मालमत्ता नोंदवहीत बांधलेल्या इमारतीच्या काही नोंदी घेतल्या असून त्यातील रकाने ७ ते १३ अपूर्ण आहेत.

२) नमुना क्रमांक ४० :- नोंदवही अपूर्ण असून ती पूर्ण करुन रस्त्याच्या नोंदी अद्ययावत असल्याचे प्रमाणित करावे.

३) नमुना क्रमांक ४१ :- मध्ये रिकाम्या जागेच्या ठिकाणी ७/१२ उतारे प्राप्त करुन त्या जागेवर अतिक्रमण झालेले नसल्याने उपअभियंता, बांधकाम विभाग ह्यांनी प्रमाणित केलेले नाही.

४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता १९६८ चे नियम ९८ अन्वये स्थावर मालमत्तेची पडताळणी केल्याचे प्रमाणपत्र सक्षम कार्यालयाला असे प्रमाणपत्र दिलेले नाही.

वरील आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यांत यावे.

---

**परिच्छेद क्रमांक २६ :- आक्षेप विवरणपत्र**

लेखा परीक्षणांत आढळून आलेल्या किरकोळ स्वरुपाच्या आक्षेपांची पुर्तता लेखा परीक्षण कालावधीत करुन घेतल्याने आक्षेप विवरणपत्र निर्गमीत करण्यात आलेले नाही.

---

**परिच्छेद क्रमांक २७ :- लेख्यांची स्थिती.**

लेख्यांची स्थिती असमाधानकारक असून लेखे सुधारण्यास वाव आहे.

---

**परिच्छेद क्रमांक २८ :- वार्षिक लेखे.**

या लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांचे संपूर्ण पूर्ततेस अधिन राहून व निवडक महिन्यांशिवाय इतर महिन्यांतील जमा खर्चामध्ये कुठलीही गंभीर अनियमितता अंतर्गत लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेली नाही याआधारे जिल्हा परिषदेचे सन २००७ - २००८ चे लेखे बरोबर आढळून आले आहेत, असे नमुद करण्यात येत आहे.

---

**परिच्छेद क्रमांक २९ :- अनुपालन व पोहोच.**

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम १०(१) प्रमाणे, प्रस्तुत लेखापरीक्षण अहवालांतील आक्षेपांचे अनुपालन, चार महिन्यांचे आत पंचायत समितीच्या अनुपालन विषयक ठरावाच्या प्रतिसह तीन प्रतीत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे स्वाक्षरीने पाठविण्यांत यावे, तसेच अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक कळवून पोहोच दयावी.

(वि. ए. कोते)
उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक.

**प्रत -सविनय सादर..**

१) मा. सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (पत्राने)
२) मा. महालेखापाल, बाहय लेखा परीक्षण विभाग, मुंबई.
३) मा. आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
४) मा. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.
५) मा. उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक .

**प्रत -सस्नेह अग्रेषित :-**

१) म. उपमुख्य लेखा परीक्षक (पंचायत राज समिती), स्थानिक निधी लेखा, मुंबई
२) म. गटविकास अधिकारी (उच्च श्रेणी), पंचायत समिती - नाशिक जिल्हा - नाशिक.

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक